# अपर पोलीस महासंचालक,
# गुन्हे अन्वेषण विभाग,
# महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

जाहिरात क्र. अपोमसं/ गुआवि/आस्था-२ व ३ सरळसेवा भारती / २०१७/7191 पुणे दिनांक १२/१२/२०१७

## – शुद्धिपत्रक –

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयाचे आस्थापनेवरील तपासणीस/ पोलीस उपनिरीक्षक (अंमु) यांची ४७ रिक्त पदे व सहाय्यक शासकीय दस्तऐवज परीक्षक यांची १० रिक्त पदे अनुक्रमे महाराष्ट्र पोलीस नियमावली, भाग - एक मधील नियम ६२ व महाराष्ट्र शासन, गृह विभाग, राजपत्र दिनांक ०४.०६.१९८७ मधील तरतुदीनुसार नामनिर्देशनाने भरावयाची असून, त्यासाठी इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवारांकडून ऑन लाईन पद्धतीने अर्ज दि. १४.१२.२०१७ रोजीपर्यंत स्वीकारले जाणार होते.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. एफएसएल- ०४१७/ प्रक्र. ७०२/ पोल-४ दिनांक ०८/१२/२०१७ नुसार सहायक शासकीय दस्तऐवज परीक्षकपदाच्या सध्याच्या सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेस समकक्ष म्हणून विज्ञान पदवीधर, न्यायसहाय्यक विज्ञान (B.sc. (Forensic Science) ग्राह्य धरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार महाऑनलाईनचे व या कार्यालयाचे संकेत स्थळावर शुद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

उक्त दोन्ही पदं भरती संबंधातील महाऑनलाईनचे संकेतस्थळावर यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सविस्तर जाहिरातीमधील व शुद्धिपत्रकातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. उक्त दोन्ही पदे भरती संबंधात अर्हता प्राप्त करणारे उमेदवारांना खालील दिलेल्या विहित दिनांकापर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

उमेदवार फक्त ऑनलाईन पद्धतीने **https://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर भेट देऊन आवेदन अर्ज भरू शकतात.

| | | |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन आवेदन अर्ज सुरू होण्याचा दिनांक | १५.११.२०१७ |
| २. | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | २४.१२.२०१७ |
| ३. | स्टेट बँकेत पैसे भरण्याचा शेवटचा दिनांक | २६.१२.२०१७ |

भरतीकरिता तपशीलवार जाहिरात व शुद्धिपत्रक **https://maharecruitment.mahaonline.gov.in** व **www.mahacid.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(श्रीकांत तरवडे)**
**पोलीस उपमहानिरीक्षक (प्रशासन),**
**गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे**

डीजीआयपीआर-2017-2018/4709